**विशेष दिवाणी दावा क्र. ४८/२०१९**

CNR No. MHSO060005862019

द्रौपदी वाघमोडे

वि.

बिरा कोकरे वगैरे

**आदेश निशाणी क्र. १६ आणि निशाणी क्र. १ वर**

०१. हा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ बिरा उर्फ बिराप्पा तुका कोकरे हे दिनांक ३१/०३/२०२१ रोजी तर प्रतिवादी क्र. २ काशीबाई बिरा उर्फ बिराप्पा कोकरे या दिनांक १७/०४/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. त्या दोघांचेही वारस अगोदरच या प्रकरणामध्ये रेकॉर्डवर आहेत. त्यामुळे केवळ मयत प्रतिवादी १ व २ यांची नावे दावा निशाणी क्र. १ मधून वगळण्यास व त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी वादी यांनी हा अर्ज दिला आहे.

०२. त्यावर प्रतिवादी यांनी आक्षेप नोंदवला आहे. अर्ज मुदतीत नाही. दाव्याचे कामकाज लांबणीवर पडावे यासाठी हा अर्ज दिला आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

०३. हा दावा सरस निरस मानाने वाटप होऊन मिळावे यासाठी दाखल करण्यात आलेला आहे. वादी व प्रतिवादी हे एकाच कुटुंबातील व्यक्ती आहेत. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ व २ हे मयत झाले आहेत. त्याचे वारस अगोदरच रेकॉर्डवर आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. १ व २ यांची नावे दावा निशाणी क्र. १ मधून वगळण्यास परवानगी देणे आवश्यक आहे. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र. १ व २ यांची नावे वगळण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी दावा निशाणी क्र. १ मध्ये दुरुस्ती करावी.

SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR

Digitally signed by SHRIKRISHNA HARIBHAU INAMDAR
Date: 2022.03.25 12:47:12 +0530

दि. २५/०३/२०२२

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 25/03/2022 |
| Order uploaded on | : | 25/03/2022 |